महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय
[illegible], पुणे-१

दूरध्वनी क्रमांक [illegible] | फॅक्स क्र. [illegible]
ई-मेल आय डी : dydpune@gmail.com | वेब साईट आय डी : www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/पी.ए. स्पेशल /शै.सहली /पुवि/२०१८-१९/0304 दिनांक :- / ०९ /२०१८.
11 OCT 2018

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक विद्यालये /
कनिष्ठ महाविद्यालये, अहमदनगर / पुणे / सोलापूर.

**विषय:- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजनाबाबत...**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास सर्वांना कळविण्यात येते की, दरवर्षी प्रस्तुत कार्यालयास तसेच जिल्हा स्तरावर आपल्या कडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजनाबाबत परवानगीसाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात.

शैक्षणिक सहलीचे ठिकाण मात्र पर्यटन, मनोरंजनात्मक स्थळी तसेच विद्यार्थ्यांचे अपघात होतील अशा निसर्गरम्य स्थळी आयोजन केलेले असल्याने, वरिष्ठ कार्यालयांनी प्रस्तावांना परवानगी दिल्यास तसेच काही दुर्दैवाने सहलीबाबत विद्यार्थ्यांच्या बाबतीत वाईट घटना घडल्यास परवानगी देणा-या कार्यालयांना जबाबदार धरले जाते, मा. आयुक्तालय व मा. संचालनालयाकडून विनाकारण परवानगी देणा-या कार्यालयांना दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागते.

त्या अनुषंगाने आपणांस सर्वांना सदर पत्रानुसार सूचित करण्यात येते की, चालू शैक्षणिक वर्षी फक्त विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासात्मक तसेच ज्ञानात भर पडेल अशा शैक्षणिक, अभ्यासात्मक , संशोधनात्मक स्थळी / ठिकाणीच आपणामार्फत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात यावे. सहलीचे कारण व ठिकाण योग्य वाटल्यास प्रस्तुत कार्यालयामार्फत परवानगी दिली जाईल. शैक्षणिक सहलीचे ठिकाण मात्र पर्यटन, मनोरंजनात्मक स्थळी तसेच विद्यार्थ्यांचे अपघात होतील अशा निसर्गरम्य स्थळी आयोजन केल्याचे प्रस्तावात आढळून आल्यास संबंधित प्रस्ताव सादर करणा-या तसेच विनापरवानगीने परस्पर सहल आयोजन करणा-या मुख्याध्यापकांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात येईल.

वरील प्रमाणे दिशा निर्देशानुसारच शैक्षणिक सहलींचे आयोजन केलेले असल्यास, फक्त अशाच प्रस्तावांना प्रस्तुत / वरिष्ठ कार्यालयाकडून परवानगी देण्यात येईल. तसेच आयोजन केल्यानंतर सहलीबाबत कुठलाही अनुचित प्रसंग घडल्यास प्रस्तुत कार्यालय त्यासाठी जबाबदार राहणार नाही. त्यासाठी संबंधित मुख्याध्यापक व प्राचार्य हेच जबाबदार राहतील याची सर्व शालेय प्रशासन तसेच मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

<u>प्रस्तावासोबत आवश्यक खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.</u>

१.प्राचार्यांचे विनंती पत्र.
२.प्राचार्यांचे १००/-च्या स्टॅम्प पेपरवरील हमीपत्र.
३.विद्यार्थ्यांची यादी सही शिक्क्यानिशी.
४.शिक्षकसोबतची यादी.
५.संस्था अध्यक्षांच्या परवानगीचे पत्र.
६.बस वाहन यादी / विद्यार्थ्यांच्या वाहनाचा आर टी ओ परमिट परवाना.
७.विद्यार्थ्यांच्या विमाबाबत प्रती.
८.पालकांचे व विद्यार्थ्यांचे संमतीपत्र.
९.सहलीचे ठिकाण अंतर व कालावधी.
१०.प्रथमोपचार पेटीबाबत माहिती.
११.विद्यार्थ्यांच्या राहण्याबाबतची माहिती.
१२.सहलीसाठी विद्यार्थी शारीरिक दृष्ट्या सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र.

MRaut
(मिनाक्षी राऊत).
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

प्रत:-
शिक्षणाधिकारी,(माध्यमिक/प्राथमिक/निरंतर), जिल्हा परिषद, पुणे विभाग, पुणे अहमदनगर / सोलापूर / पुणे , गटशिक्षणाधिकारी, पंचायत समित्या, पुणे विभाग, पुणे , शिक्षण मंडळ प्राथमिक / माध्यमिक, सर्व मनपा व नगर पालिका शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी

/

**वाचावे :**

१) या कार्यालयाचे परिपत्रक जाक्र/शिउसं/पुवि/प्राथ.माध्य.उमाध्य./२०१६/२२५६, दि. २.२.२०१६

२) वेळोवेळी यापूर्वी काढण्यात आलेली परिपत्रके.

जाक्र/शिउसं/पुवि/प्राथ.माध्य.उमाध्य./२०१६/ 3042/16
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक :- ११/०२/२०१६

11 FEB 2016

प्रति,

१) शिक्षण प्रमुख, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ,पुणे

२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) पुणे, अहमदनगर,सोलापूर

३) प्रशासन अधिकारी, पिंपरीचिंचवड/न.पा. शिक्षण मंडळ, पुणे, अहमदनगर,सोलापूर

विषय : शालेय विद्यार्थ्यांच्या सहलीबाबत घ्यावयाची दक्षता व त्यासंबंधीच्या मार्गदर्शक नियमावली.

संदर्भ : १. आबेदा इनामदार महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयातील १३ विद्यार्थी समुद्रात बुडून मृत्युमुखी पडल्याची घटना दि. १.०२.२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आबेदा इनामदार, पुणे या महाविद्यालयाची सहल मुरुड-जंजिरा याठिकाणी असताना समुद्रात बुडून १३ विद्यार्थी मृत्युमुखी पडले या पार्श्वभूमीवर प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळेच्या सहली काढताना शासन परिपत्रकातील नियमावलीनुसार पालन करावे असे प्राचार्य, मुख्याध्यापक पुणे विभागातील सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळा कनिष्ठ महाविद्यालये यांना कळविण्यात यावे.

शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दि. २.२.२०१६ रोजी जे परिपत्रक पुणे विभागासाठी निर्गमित केले होते. त्यातील काही नियमांबाबत मिडीयामधून व इतर घटकांकडून टीका झाली होती. ह्या सर्व नियमांवर चर्चा करण्यासाठी शिक्षण तज्ञ, प्राचार्य/ मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, पालक शिक्षण विभागाचे अधिकारी, पत्रकार यांची बैठक दि. ११.२.२०१६रोजी स. ११.३०वाजता मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे येथे आयोजित करण्यात आली . बैठकीमध्ये या सर्व नियमांवर सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेअंती काही नियमांमध्ये अंशतः बदल करुन सुधारीत नियमावली लागू करण्यात येत आहे, त्यानुसार दक्षता घेण्यात यावी.

१) समुद्राचे किनारे/बीच, अतिजोखीमीची पर्वतावरील ठिकाणे , नदी, तलाव, विहिरी तसेच उंच टेकड्या इत्यादी ठिकाणी शैक्षणिक सहलीचे आयोजन करताना पुरेशी काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना गड किल्ले दाखविण्यात यावेत.

२) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली नेण्यापूर्वी दोन प्रशिक्षीत शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सहलीबाबत इत्यंभूत माहिती देण्यासाठी तसेच आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास बचाव करण्याबाबत विद्यार्थ्यांना

..२

Scanned by CamScanner

आवश्यकतेनुसार प्रशिक्षण देण्यात यावे.

३) विद्यार्थ्यांना सहलीसाठी नेणार असल्यास सोबत प्रथमोपचार पेटी असावी स्थानिक डॉक्टरांचे तसेच जेथे सहल जाणार आहेत तेथील शासकीय रुग्णालयांचे संपर्क क्रमांक सोबत ठेवावेत.

४) सहलीचे नियोजन करताना त्याचा आराखडा पालकांपर्यंत पोहोचवला जावा. पालकांच्या सूचनाही विचारात घ्याव्यात तसेच गरज भासल्यास पालकांचा एक प्रतिनिधी सहलीसोबत ठेवावा.

५) सहलीला निघण्यापूर्वी विदयार्थ्यांच्या पालकांकडून संमतीपत्र घेणे बंधनकारक राहील.

६) सहलीचे ठिकाण निश्चित झाल्यानंतर संबंधित ठिकाणाच्या भौगोलिक वातावरणानुसार घ्यावयाची काळजी व प्राथमिक उपचार इत्यादीबाबत विदयार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले जावे.

७) सहली नेहताना फक्त एसटी. बस तसेच अन्य शासकीय मान्यता असलेल्या आरटीओने मान्य केलेल्या वाहनांतूनच सहली घेवून जाव्यात.

८) वीस विदयार्थ्यांच्या मागे एक शिक्षक असावा.

९) सहलीला आलेल्या विदयार्थिनीना एकटे-दुकटे व नजरेआड फिरण्यास सोडू नये.

१०) शिक्षकांनी तंबाखू, गुटखा तसेच अन्य मादक पदार्थांचे सेवन करु नये

११) सहलीला जाणा-या विदयार्थ्यांना गरजेनूसार मोबाईल फोनवरुन पालकांच्या संपर्कात राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

१२) माध्यमिक व उच्च माध्यमिकच्या विदयार्थ्यांना ट्रेकिंग, पोहणे इत्यादी परवानगी देताना पुरेशी काळजी घ्यावी.

१३) विदयार्थ्यांना सहलीस येण्याची सक्ती करण्यात येवू नये.

१४) विदयार्थ्यांकडून शैक्षणिक सहलीसाठी योग्य शुल्क आकारावे.

१५) माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयार्थ्यांच्या सहलीचा कालावधी त्यांचा अभ्यासक्रम आणि वयोगटानुसार ठरवावा.

१६) प्राथमिक विभाग वगळून राज्याबाहेरील सहली नेण्यास हरकत नाही. मात्र पुरेशी काळजी घ्यावी.

१७) सहलीतील विदयार्थ्यांच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी संबंधित विदयालयाचे प्राचार्य, मुख्याध्यापक, सहलीतील सर्व शिक्षक यांची राहील.

१८) सहलीत विदयार्थिनींचा सहभाग असल्यास महिला शिक्षिका तसेच शक्यतो एक महिला पालक प्रतिनिधी बरोबर असणे आवश्यक राहील.

१९) विदयार्थी/विदयार्थिनीबरोबर कोणतेही गैरवर्तन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२०) सहलीत शाळेचे विदयार्थी, शिक्षक, शाळेने नामनिर्देशित केलेला पालक प्रतिनिधी( शिक्षक पालक संघ सभासद) यांच्या व्यतिरिक्त बाहेरील कोणाचाही समावेश राहणार नाही.

२१) प्राथमिक,माध्यमिक, उच्चमाध्यमिक शाळांनी सहली काढताना संबंधित गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण प्रमुख, शिक्षण उपसंचालक यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील तसेच संबंधित अधिका-यांना सहलीच्या सर्व बाबी लेखी स्वरुपात अवगत कराव्यात.

२२) प्राथमिक शाळेच्या सहली हया परिसर भेट तसेच त्याचदिवशी परत घरी सुखरुप पोहोचतील अशा स्वरुपाच्या असाव्यात.

२३) सहासी खेळ . वॉटरपार्क, ॲडव्हेंचर पार्क असलेल्या ठिकाणी सहली काढल्यास पुरेशी काळजी घ्यावी.

२४) रेल्वे क्रॉसिंगवरुन बस नेताना शिक्षकांनी सावधगिरी बाळगावी. रेल्वेचे फाटक नसलेल्या ठिकाणी रेल्वे पुढे गेल्याची खात्री करुनच बस पुढे घेवून जावी.



Scanned by CamScanner

२५) रात्रीचेवेळी प्रवास टाळावा.

२६) शाळेच्या शिक्षकांच्या निष्काळजीपणामुळे अपघात झाल्यास संबंधित शिक्षक, मुख्याध्यापक,प्राचार्य, संस्थेचे संबंधित जबाबदार पदाधिकारी या सर्वांवर नियमानुसार गरज भासल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करणेबाबत संबंधित शिक्षणाधिकारी/उपसंचालक यांचेमार्फत संबंधित संस्थेकडे शिफारस करण्यात येईल.

२७) विदयार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत विदयार्थ्यांची हेळसांड, कुचंबना होणार नाही याची दक्षता घ्यावी. झाल्यास, मानसिक/शारिरीक त्रास झाल्यास तशी पालकांकडून तक्रार आल्यास चौकशीअंती दोषी आढळल्यास संबंधित जबाबदार शिक्षक, मुख्याध्यापक, प्राचार्य यांचेविरुध्द कारवाई केली जाईल.

वरील सूचनांचे काटेकोरपणे गांभियांने पालन करावे, शाळा/विदयालय स्तरावर संबंधितांचे हमीपत्र घेवून मगच सहलीला परवानगी दिली जावी. हलगर्जीपणा करणा-या अधिका-यांवरसुध्दा कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

२८) सहलीसाठी शाळा व्यवस्थापनाची परवानगी घेण्यात यावी.

२९) ज्या ठिकाणी सहल काढायची तेथील स्थानिक प्रशासनास कळवावे म्हणजे आपत्कालीन स्थितीत मदत होईल.

३०) शाळेत सहल समिती स्थापन करावी. सदर सहल समितीने सहल कार्यक्रम निश्चित करावा.

३१) शिक्षक, पालक, विदयार्थी यांचे प्रबोधन करावे.

३२) जबाबदार दोन व्यक्तींनी सहल ठिकाण पाहून यावे, संभाव्य धोक्यांची ठिकाणे लक्षात घेवून सहलीचे नियोजन करावे.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे.

प्रत :

१) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२) मा. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे
३) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
४) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
५) सर्व संबंधित अधिकारी
६) सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, संस्थाचालक(सर्व) पुणे विभाग, पुणे